**103.** घर पुढीलपैकी काय देत नाही?

(1) स्थैर्य (2) संपत्ती

(3) निवारा (4) संरक्षण

**104.** घराला कशामुळे चेहरा प्राप्त होतो?

(1) माणसाच्या प्रवेशामुळे (2) माणसाच्या चेहऱ्यामुळे

(3) माणसाच्या स्वभावामुळे (4) घराच्या उंबरठ्यामुळे

**105.** 'तो घरात आणून ठेवतो' अधोरेखित काय आहे?

(1) उभयान्वयी अव्यय (2) संयुक्त क्रियापद

(3) सकर्मक क्रियापद (4) अकर्मक क्रियापद

**106.** उताऱ्याप्रमाणे पुढीलपैकी कोणती बाब घराला लागू होत नाही?

(1) खाजगी (2) बंदिस्त

(3) सुरक्षित (4) सामुहिक

**सूचना :** पुढील कविता वाचा आणि प्रश्न क्रमांक **107** ते **112** यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.

हिरवे हिरवे गार गालिचे
हरित तृणांच्या मखमालीचे
त्या सुंदर मखमालीवरतीं
फुलराणी ही खेळत होती
गोड निळया वातावरणांत
अव्याज मनें होतीं डोलत
प्रणयचंचला त्या भ्रूलीला
अवगत नव्हत्या कुमारिकेला
आईच्या मांडीवर बसुनी
झोंके घ्यावे, गावीं गाणीं
याहुनि ठावें काय तियेला
साध्या भोळ्या फुलराणीला

पुरा विनोदी संध्यावात
डोलडोलवी हिरवें शेत
तोंच एकदां हांसत आला
चुंबून म्हणे फुलराणीला
"छान माझी सोनुकली ती
कुणाकडे ग पाहत होती?
कोण बरें त्या संध्येतून
हळुच पाहते डोकावून?
तो रविकर का गोजिरवाणा
आवडला अमुच्या राणींना?"
लाजलाजली या वचनांनीं
साधी भोळी ती फुलराणी!

**107.** 'छान माझी सोनुकली' असे फुलराणीला कोण म्हणाले?

(1) संध्या (2) शेत

(3) वारा (4) आई

**108.** संध्याकाळी हळूच कोण डोकावून बघत आहे?

(1) सूर्य (2) वारा

(3) फुलराणी (4) कुमारिका

**109.** 'झोंके घ्यावे, गावीं गाणीं' या ओळीतील अधोरेखित शब्दांचे व्याकरण ओळखा

(1) शब्दयोगी अव्यय (2) क्रियापद

(3) कर्ता (4) कर्म

**110.** 'अव्याज' या शब्दाचा समानार्थी नसलेला शब्द कोणता?

(1) प्रेमळ (2) साधा

(3) सरळ (4) निष्कपट

www.careerindia.com

CAREERINDIA

**111.** फुलराणीच्या संदर्भात कवीने वापरलेला 'प्रणयचंचला' हा शब्द काय आहे?

(1) विशेषनाम (2) विशेषण

(3) सर्वनाम (4) शब्दयोगी अव्यय

**112.** 'आईच्या मांडीवर बसुनी' या ओळीतून कवी फुलराणीबद्दल काय सुचवत नाही?

(1) फुलराणीचा हट्टी स्वभाव (2) फुलराणीचे लहानपण

(3) फुलराणीचे साधेपण (4) फुलराणीचे निर्व्याजमन

**113.** भाषा शिक्षणाच्या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान योग्य आहे?

(1) भाषा शिक्षण अनवधानाने होते

(2) भाषा शिक्षण हे फक्त भाषिक पाठ्यपुस्तके वाचून होते.

(3) भाषा शिक्षणाला मुद्रितसंपन्न वातावरणात वेग मिळतो.

(4) विज्ञान आणि गणिताच्या शिक्षणासाठी भाषा शिक्षणाची गरज नसते.

**114.** रडणे, हुंकारणे, बडबडणे ही सर्व कोणत्या स्तराच्या भाषिक विकासाची लक्षणे आहेत?

(1) ससंदर्भ (Referential) (2) भाषिक (Linguistic)

(3) पूर्व-भाषिक (Pre-linguistic) (4) भावनिक (Expressive)

**115.** गर्वित वर्गात आपल्या मित्रांसोबत हिंदीत गप्पा मारत होता. जेव्हां त्याच्या शिक्षकांनी हाक दिली तेव्हा त्याने इंग्रजीत उत्तर दिले. हे कशाचे उदाहरण आहे?

(1) भाषा-बदल (2) भाषा-मिश्रण

(3) बोली (4) समाज भाषाविज्ञान

**116.** प्रत्येक अभ्यासक्रमात शिक्षणाचे फलित (outcomes) यांचा उल्लेख असतो याचा अर्थ

(1) शिक्षकाच्या शिक्षण पद्धतीत बदल (2) पाठ्यपुस्तकातील सामग्रीचा विचार करणे

(3) वर्गातील मुलांच्या वर्तनात होणारे बदल (4) सर्वपाठ पूर्ण होणे

**117.** प्रत्येक अभ्यासक्रम शिक्षणाचे फलित यावर भाष्य करते. शिक्षणाचे फलित (learning outcomes) म्हणजे

(1) शिक्षकाच्या शिक्षण पद्धतीत बदल (2) पाठ्यपुस्तकातील सामग्री विचारात घेणे

(3) विद्यार्थांच्या वर्तन व्यवहारातील परिवर्तन (4) सर्व पाठांचा अभ्यास पूर्ण करणे

**118.** तुमच्या फोनमधील संपर्कसूचीतून एक नंबर शोधणे. हे कशाचे उदाहरण आहे?

(1) चाळणे (Skimming) (2) न्याहाळणे (Scanning)

(3) पाहणी (Survey) (4) पुनर्पाहिणी (Review)

**119.** विद्यार्थ्यांना नवीन शब्दाचा अर्थ पाठ करायला लावण्या ऐवजी त्यांना नवीन शब्द ससंदर्भ समजावून देणे

(1) वेळेचा अपव्यय आहे (2) अनेकदा विद्यार्थ्यांना संभ्रमित करते

(3) शब्द नीट समजून ध्यायला मदत करते (4) घोकंपट्टी करण्यास उत्तेजन देते

**120.** अशाप्रकारचे लेखन ज्यात लेखक स्वतः त्यातील पात्र बनतो (काहीवेळा नसतो ही) आणि निवेदन करतो. याला काय म्हणतात?

(1) कथन (2) निवेदनात्मक (Expository)

(3) लाघवी (Persuasive) (4) वर्णनात्मक

www.careerindia.com

CAREERINDIA

# PART—V / भाग—V

## LANGUAGE—II / भाषा—II
## Marathi / मराठी

***महत्त्वपूर्ण*** : परीक्षार्थींनी **भाषा–II** यासाठी पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–V** मधील **(प्रश्न क्रमांक 121–150)** यांची उत्तरे द्यावीत.

**121.** कादंबरी वाचणे, हे कशाचे उदाहरण आहे?

(1) चाळणे
(2) विस्तृत वाचन
(3) गहन वाचन
(4) न्याहाळणे

**122.** निबंधात 'अवतरण' वापरणे याचे प्राथमिक उद्दिष्ट कोणते?

(1) एखाद्या माहितीचे विश्लेषण करणे
(2) निबंधाची शैली ठरवणे
(3) गुंतागुंतीचा मुद्दा स्पष्ट करणे
(4) लेखकाचा दृष्टिकोण मांडणे

**123.** इयत्ता आठवीची शिक्षिका विद्यार्थ्यांना एक लेख देते. या लेखाचा दर्जा त्यांच्या पातळीपेक्षा किंचित वरचा आहे. विद्यार्थ्यांनी त्या संबंधाने अनेक उपक्रम करायचे आहेत. या उपक्रमाला काय म्हणता येईल?

(1) आकलनीय आदान (Comprehensible inputs)
(2) कल्पनाबंध/सिद्धांत शिकणे (Learning hypothesis)
(3) अनाकलनीय आदान (Incomprehensible inputs)
(4) वाचन आकलन (Reading comprehension)

**124.** व्याकरणाचे शिक्षण प्रामुख्याने कोणत्या बाबतीत उपयुक्त ठरते?

(1) अंकसाक्षरता
(2) ओघवता
(3) अचूकता
(4) साक्षरता

**125.** व्याकरण शिक्षणाचे उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांना संभाषण करण्यास प्रवृत्त करणे. पुढीलपैकी कोणती कृती या उद्दिष्टाशी सुसंगत नाही?

(1) चुका दुरुस्त करणे ही शिक्षकाची प्राथमिक जबाबदारी नाही.
(2) विद्यार्थ्यांचे व्याकरणाच्या प्रत्येक घटकावर प्रभुत्व असणे.
(3) विद्यार्थ्यांना अशा प्रकट सूचनांची आवश्यकता असते ज्यातून व्याकरणिक घटकांची व्यापक संभाषण संदर्भाशी सुसंगती लागते.
(4) विद्यार्थ्यांनी तितक्याच गोष्टी शिकल्या पाहिजेत ज्या तात्पुरत्या संभाषणास आवश्यक असतात.

www.careerindia.com

CAREERINDIA

**144.** विद्यार्थ्यांच्या संभाषण कौशल्याचे मूल्यमापन करण्यासाठी पुढीलपैकी कोणती मूल्यमापन पद्धती अधिक उपयुक्त ठरेल?

(1) सांगितलेल्या मुद्यावर भाषण लिहिणे
(2) चित्र पुस्तकातील दृष्याचे विवरण सांगणे
(3) नाटकात भूमिकाभिनय करणे
(4) ध्वनिफीत ऐकून त्यावर भाष्य करणे

**145.** चॉम्स्कीच्या मते माणसांकडे भाषा विकसित करण्यासाठी ______ हे असते.

(1) संप्रेषण तत्परता
(2) शैक्षणिक संच
(3) जैविक कल
(4) विशिष्ट दृष्टिकोणात्मक संच

**146.** अगदी आरंभीच्या अवस्थेपासून शाळेत बहुभाषिकतेचे धोरण स्वीकारल्याने पुढीलपैकी कोणत्या गोष्टीवर आळा घालता येईल?

(1) सुमार संभाषण कौशल्य
(2) शाळेतील विद्यार्थ्यांची गळती
(3) शैक्षणिक अक्षमता
(4) एखाद्याची त्याची भाषा लुप्त होणे

**147.** नवीन पाठाची सुरुवात करण्यापूर्वी तुम्ही विद्यार्थ्यांना तरतरीत होण्यासाठी गमती जमतीच्या गोष्टी करायला लावता. हे करण्याचे कारण

(1) विद्यार्थ्यांचे लक्ष वळवणे
(2) विद्यार्थ्यांना वर्गासाठी प्रेरित करणे
(3) शिक्षक म्हणून स्वतःचा भार हलका करणे
(4) पाठसुरु करण्यापूर्वी वर्गात अनुशासन असणे

**148.** अध्ययनाचा सिद्धांत म्हणून विधायकतावाद (Constructivism) मानते

(1) शिकणे ही सामाजिक गुंफण आहे
(2) शिकणे हे वैयक्तीक गुणविशेष आहे
(3) सर्व विद्यार्थी भाषा शिकू शकत नाही
(4) शिकणे ही पूर्णतः मानसिक घटना आहे

**149.** अनेकदा माणसे एकाच वाक्यात अनेक भाषाचे घटक गुंफतात. असे करणे म्हणजे

(1) बोली
(2) भाषा बदल
(3) भाषा मिश्रण
(4) समाज भाषा विज्ञान

**150.** विद्यार्थांना अनेकदा भाषेच्या वैशिष्ट्यपूर्ण उच्चारण नियमांमुळे बोलण्यात अडचण येते. या अडचणीवर मात करण्यासाठी कोणता उपाय उपयुक्त आहे?

(1) विद्यार्थांच्या चुका त्या त्या वेळेलाच दुरुस्त करणे
(2) विद्यार्थ्यांना वर्गात वाचन करण्यास उत्तेजन देणे
(3) समुपदेशकाच्या मदतीने उच्चार उपचार करुन घेणे
(4) खेळ सदृष्य उपक्रम करणे ज्यातून वर्गात मौखिक संभाषण करावे लागेल

www.careerindia.com

